२१ भारतीय कर रचना (Indian Tax Structure)

अर्थ -

- **प्रा. सेलिग्मन च्या मते** - "कोणत्याही लाभाशी संबंध न ठेवता सामुहिक हितासाठी शासनाने केलेला खर्च पुर्ततेसाठी जनतेकडुन सक्तीने वसुल केलेली रक्कम म्हणजे कर होय."
- **प्रा. डाल्टन च्या मते** - "कर हे सक्तीचे देणे असून याचा सरकारी सेवेशी निश्चित संबंध नसुन, कायदेशिर गुन्ह्यासाठी ते आकारले जात नाहीत."

करांची वैशिष्ट्ये	कराची तत्त्वे - ॲडम स्मिथ	इतर कराची तत्त्वे
▪ कर केवळ शासनच आकारु शकते. ▪ कर सक्तीचे देणे आहे. ▪ करास कायद्याचा आधार असतो. ▪ कर म्हणजे करार नव्हे. ▪ शासकीय उत्पन्नचे प्रमुख साधन. ▪ घटनेतील कलम 265 नुसार कर आकारणी. ▪ कर हे महसुली उत्पन्नाच स्त्रोत आहेत.	▪ क्षमता - Ability ▪ निश्चितता - Certainty ▪ सोयीचे तत्त्व - Convenience ▪ मितव्ययता - Economy ▪ ॲडम स्मिथ यांनी वेल्थ ऑफ नेशन या ग्रंथांत कराची तत्त्वे मांडली आहेत.	▪ सुलभता ▪ उत्पादकता ▪ विविधता ▪ लवचिकता ▪ परिवर्तनियता



प्रत्यक्ष कर (Direct Tax) -

- प्रत्यक्ष कर म्हणजे कायद्यानुसार ज्या व्यक्तीवर हा कर आकारला जातो तोच त्या व्यक्तीला भरावा लागतो.
- प्रत्यक्ष कराचे संक्रमण होत नाही म्हणजे हे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित करता येत नाहीत.

गुण		दोष
काटकसर	-	हे कर अप्रिय स्वरुपाचे असतात.
निश्चितता	-	ग्राहकांची गैरसोय होते.
समता	-	वयक्तिक भर
जाग्रकता	-	अन्यायकारक स्वरुप
विषमेत घट	-	वसुली खर्च जमा



अप्रत्यक्ष कर (Indirect Tax)

- अप्रत्यक्ष कराबाबतीत ज्या व्यक्तीवर कराघात आहे. किंवा करभार आहे तो दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित करता येतात.
- अप्रत्यक्ष कराचे संक्रमण होवू शकते म्हणजे अशी कर एकाकडुन दुसऱ्याकडे हस्तांतरित होतात.

गुण		दोष
सोयीचे	-	वेळखावू व खर्चित पद्धत
लवचिक स्वरुपाचे कर	-	बचतिला प्रतिकुल
कर टाळता येत नाहीत	-	अनिश्चितता
व्यापक आधार	-	प्रतिगामी स्वरुप
उत्पादक कर		

कर आकारणीच्या दरावरुन कराचे प्रकार -

1) **पुरोगामी कर** (Progressive Tax) -

- उत्पन्नाच्या वाढीबरोबर कराच्या दरामध्ये वाढ होते.
- उदा. उत्पन्न 5 लाख, 10 लाख, 15 लाख अनुक्रमे कर - 10%, 20%, 25%

2) **प्रतिगामी कर / न्युन कर** (Regrassive Tax) -

- उत्पन्नाच्या वाढीबरोबर कराच्या दरामध्ये घट होते.
- उदा. उत्पन्न 5 लाख, 10 लाख, 15 लाख अनुक्रमे कर - 25%, 20%, 10%

3) **प्रमाणबद्ध कर** (Propotional Tax) -

- विशिष्ट उत्पन्नावर विशिष्ट कराची आकारणी होते. उत्पन्नात वाढ किंवा घट झाली असता कराच्या दरात काहीही बदल होत नाही.
- उदा. उत्पन्न 5 लाख, 10 लाख, 15 लाख अनुक्रमे कर - 10%, 10%, 10%

4) **ऱ्हासमान पुरोगामी कर** (Degrassive Tax) : -

उत्पन्नवाढीबरोबर कर वाढतात पण करामध्ये होणरी वाढ ही कमी प्रमाणात होणारी वाढ होते.

उदा. कराचे दर 10% , 10.5%, 10.7% या प्रमाणात करामध्ये वाढ होते.

1) वैयक्तिक उत्पन्न कर/आयकर :-

केंद्राचे कर (Taxes of centre) :

कलम 246 नुसार घटनेच्या सातव्या परिशिष्टातील केंद्र सूचीत केंद्राचे आणि राज्यसूचीत राज्यांचे कर असे स्पष्ट वर्गीकरण करण्यात आले आहे.

महत्त्वाचे केंद्रीय कर

1) आयकर (कृषी उत्पन्न सोडून इतर उत्पन्नावरील)
2) सीमाशुल्क
3) केंद्रिय उत्पादनशुल्क
4) निगम कर
5) संपत्तीच्या भांडवली मूल्यावरील कर
6) मालमत्ता कर
7) वस्तुंच्या आंतरराज्यीय खरेदी व विक्रीवरील कर
8) वस्तुंच्या आंतरराज्यीय निर्गमनावरील कर
9) सेवा कर
10) वर्तमानपत्रांची खरेदी व विक्री आणि त्यातील जाहिरातीच्या प्रकाशनावरील कर, इ.

राज्यांशी संबंधित कर

1) जमीन कर
2) कृषी उत्पन्नावरील कर
3) शेतजमिनीच्या वारसा हस्तांतरणावरील कर
4) शेतजमिनीवरल मालमत्ता कर
5) जमिनी व इमारतीवरील कर
6) खनिजांवरील कर
7) राज्यउत्पादन शुल्क
8) वस्तुंच्या आगमानवरील कर
9) वीज खरेदी व विक्रीवरील कर
10) वस्तू खरेदी व विक्रीवरील कर (केंद्रसुचीतील 92 A तील वस्तू सोडून इतर)
11) जाहिरातींवरील कर (वर्तमानपत्रांवरील जाहिरातीव्यतिरिक्त इतर)
12) रस्ते व अंतर्गत जलवाहतुकीतील: प्रवासी वाहतूक व माल वाहतूकीतील कर
13) वाहन कर
14) प्राणी व जहाजांवरील कर
15) जकात
16) व्यवसाय, व्यापार व रोजगारावरील कर
17) आरोग्य विमा सेवेवरील कर
18) करमणूक, मनोरंजन तसेच सट्टेबाजीवरील कर
19) (केंद्रसूचीत सुची क्रमांक 91 मध्ये सांगितलेल्या मुद्रंक शुल्कव्यतिरिक्त इतर बाबीवरील) मुद्रंक शुल्क.

प्राप्तीकर (Income Tax)
प्रत्यक्ष कर

- क्षमता तत्त्वावर आकारला जातो. (2.5 लाख करमुक्ती मर्यादा)
- पुरोगमी / प्रगतीशील कर आहे.
- 1860 पासून आकारण्यास सुरुवात.
- सध्या आयकरास इन्कम टॅक्स ॲक्ट 1961 नुसार आकारला जातो.
- 1961 कायद्याच्या ऐवजी Direct Tax Code - 2010 (DTC).
- 2002 च्या विजय केळकर समितीच्या शिफारशीनुसार 2005-06 च्या अर्थसंकल्पात सरकारने आयकराची करमुक्त मर्यादा 50,000 रु. वरुन 1 लाखांपर्यंत वाढवली होती.
- 24 जुलै, 2010 रोजी भारतातील आयकर व्यवस्थेस 150 वर्षे पूर्ण.
- देशातील पहिला आयकर कायदा 1860 साली संमत करण्यात आला होता. त्यानुसार 24 जुलै, 1860 पासून भारतात Income Tax व्यवस्थेचा कार्यारंभ झाला होता.
- 1961 च्या कायद्यान्व्ये देशी संस्था, परकीय संस्था व व्यक्ती यांचा समावेश आयकरामध्ये होतो.
- हे कर आकारताना कोणतेही भेदभाव केले जात नाहीत.
- वयोगटानुसार 60 वर्षे, 60 ते 80 वर्षे, 80 वर्षापेक्षा जास्त यानुसार कराची आकारणी केली जाते.
- हे कर प्रगतीशील व निश्चित स्वरुपाचे आहेत.
- CBDT हा विभाग प्रत्यक्ष करासंबंधीत कर गोळा करतो.
- यामध्ये भारतीय नागरिक, अनिवासी व्यक्ती, अविभागीज हिंदू कुटुंब, व्यक्तीसमुह, लोकमंडळ इत्यादींचा समावेश होतो.

नवीन कराचे दर :

करपात्र उत्पन्न	जुने कराचे दर	नवीन कराचे दर
2.50,000	0%	0%
2,50,000 ते 5,00,000	5%	0%
5,00,000 ते 7,50,000	20%	10%
7,50,000 ते 10,00,000	20%	15%
10,00,000 ते 12,50,000	30%	20%
12,50,000 ते 15,00,000	30%	25%
15,00,000 पेक्षा जास्त	30%	30%

* इतर सर्व प्रकारच्या कर सवलती रद्द करण्यात आल्या आहेत.
* इतर वजावटींचा त्याग करावा लागणार आहे.

न मिळणाऱ्या वजावटी :

* घरभाडे भत्ता
* लिव्ह ट्रॅव्हल अलाउन्स-जो पगार ४ वर्षात दोनदा मिळतो.
* पगारदारांना मिळणारे ५०,००० रुपये स्टँडर्ड वजावट.
* प्रोफेशनल टॅक्स आणि इंटरनेट भत्यात वजावट.
* फॅमिली पेन्शन मिळणाऱ्या वजावटी. १५००० रु. पर्यंत वजावट.
* गृहकर्जावरील वजावटी.
* कलम ८०D अंतर्गत मिळणारी आरोग्य विमा दृष्टयाची वजावट.
* शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास त्यावरील वजावट.
* देण्यावरील सवलती.

VAT - Value Added Tax - मूल्यवर्धित करप्रणाली -

- 1998 मध्ये VAT ही संकल्पना एफ.वाय. सिमेस यांनी मांडली आहे.
- 1960 पर्यंत जगातील 147 देशांनी VAT स्वीकारला.
- अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका येथे VAT आकारला जात नाही.
- मूल्यवर्धित कर म्हणजे वस्तूच्या वाढलेल्या मूल्यावर म्हणजेच किमतीवर आकारलेला कर होय.
- VAT ला Multistage Sales Tax सुद्धा म्हणतात.
- 1960 मध्ये जगात ब्राझील व फ्रान्स या देशात VAT आकारला गेला.
- भारतात सर्वप्रथम हरियाना 2003 या राजत VAT आकारला गेला व महाराष्ट्रात 205.
- 1976 मध्ये एल.के. झा समितीच्या शिफारीवरुन हा कर आकारला गेला.
- महाराष्ट्रात 1 एप्रिल, 2005 मध्ये VAT लागू केला.
- भारतात 550 वस्तुवर VAT आकारला जातो.
- **कराचे दर** -
  1) विशिष्ट वस्तूंवरील कर - 4%,
  2) सोने-चांदी, रत्ने - 1%,
  3) इतर वस्तू - 13.5%

Central Board of Direct Taxes (CBDT)

सत्यमेव जयते

CBDT - Central Board of Direct Taxes

स्थापना - 1944

मुख्यालय - नवी दिल्ली

प्रमुख - ज्येष्ठ आय.आर.एस.

प्रत्यक्ष कराशी संबंधी विभाग

CBIC - Central Board of Indirect Taxes and Customs

स्थापना - 24 जानेवारी, 1944

मुख्यालय - नवी दिल्ली

प्रमुख - वित्तमंत्री

अप्रत्यक्ष कराशी संबंधी विभाग

BUDGET 2022-23



Budget → direct taxes → Income tax

	Budget 2020: (NEW) Optional Slabs: if u don't claim deductions (LIC/NPS, HRA etc.)	Old slabs: if want to claim deductions
Upto ₹2.5 lakh	Nil / 0%	Nil / 0%
>₹2.5 lakh-₹5 lakh	5%	5%
>₹5 lakh to ₹7.5 lakh	10%	20%
>₹7.5 lakh to ₹10 lakh	15%	
>₹10 lakh to ₹12.5 lakh	20%	30%
>₹12.5 lakh to ₹15 lakh	25%	
>₹15 lakh	30%	
4% Health Edu cess applicable?	Yes, on all	Yes on all
Surcharge?	Rich people	Rich people

कर सवलती –

१. एखाद्या कर्मचाऱ्याने जर पगारदार व्यक्तीच्या कोरोना उपचारावर खर्च केला तर तो करपात्र होणार नाही.

२. एखाद्या व्यक्तीला जर इतर कोणी व्यक्ती अथवा संस्थेने कोरोना उपचारासाठी आर्थिक मदत केली तर कर आकारणी होणार नाही.

३. एखाद्या अपंग अथवा अक्षम व्यक्तीच्या भविष्यातील खर्चाची तरतूद करण्यासाठी त्याच्या पालकांनी विमा पॉलिसी घेतली तर पालकाच्या उत्पन्नातून ७५ हजार रुपये वजावट होते. आतापर्यंत ही सवलत जर सदर अपंग व्यक्तीला आर्थिक मदत त्याच्या पालकाच्या मृत्यू पश्चात मिळण्याची तरतुद पॉलिसीत असेल तरच मिळत असे. आता जर पॉलिसी अंतर्गत ही आर्थिक मदत पालकाच्या साठाव्या वर्षानंतर मिळण्याची तरतुद असेल तर ही सवलत मिळेल.

डिजिटल करन्सीच्या नफ्यावर ३० टक्के कर

- डिजिटल करन्सी विकून झालेल्या नफ्यावर ३० टक्के कर लागेल. सदर नफा काढताना फक्त खरेदीची किंमत वजावट म्हणून मिळेल व इतर कोणताही खर्च वजावट म्हणून मिळणार नाही.
- डिजिटल करन्सीवर झालेले नुकसान इतर उत्पन्नासमोर वजावट मिळणार नाही.
- क्रिप्टोकरन्सी जर कोणाला बक्षीस म्हणून दिली तर त्यावर बक्षीस घेणाऱ्या व्यक्तीला कर द्यावा लागेल. डिजिटल करन्सीवर एक टक्का टीडीएस करण्याची तरतुद सूचविण्यात आली आहे.

अ.क्र	कर	सुरुवात वर्ष
1.	आयकर	1860 पुर्नरचना 1960
2.	महामंडळ कर	1960-61
3.	संपत्ती कर	1957
4.	मालमत्ता कर	1953
5.	देणगीकर	1958
6.	विक्रीकर	1939
7.	उत्पादन शुल्क	1944
8.	सेवा कर	1994
9.	सिमाशुल्क कर	1962
10.	केंद्रीय मुल्याविर्धीत कर	2000
11.	राज्य मुल्याविर्धीत कर	2005
12.	MANVA	1976
13.	MODVAT	1989-87
14.	खर्च कर	1958
15.	MAT	1997
16.	DDT/FBT	2005
17.	GST	2017

वस्तु व सेवा कर (GST)

- GST हा अप्रत्यक्ष केंद्रीय स्वरुपाचा कर आहे.
- राज्य वस्तु व सेवा कर केंद्रीय वस्तु व सेवा कर यांचा समावेश GST मध्ये करण्यात आला आहे.
- 122 घटनादुरुस्ती विधेयकानुसार GST ची अमंलबजावणी करण्यात आली आहे.
- 101 घटनादुरुस्ती GST स लागु आहे.
  केंद्र व राज्य यांच्या 17 **अप्रत्यक्ष करांचा** समावेश GST मध्ये करण्यात आले आहे.
- **1 जुलै 2017** पासून **GST कर** लागु करण्यात आला आहे.
- 1954 मध्ये सर्वप्रथम फ्रान्स GST सुरु करण्यात आले.

- भारतात GST सदर्भात सर्वप्रथम वर्ष 2000 मध्ये अटल बिहारी वाजपेयी यांनी प. बंगालचे तत्कालीन वित्तमंत्री सर्वप्रथम असीम दासगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली उत्तेजनार्थ समिती नेमली.
- GST ची संकल्पना सर्वप्रथम 2004 मध्ये नेमलेल्या विजय केळकर समितीने मांडली.
- 2006-07 च्या अर्थसंकल्पात तत्कालीन अर्थमंत्री पी.चिदंबरम यांनी 1 एप्रिल, 2010 पासून GST लागू करण्याचे घोषित केले. परंतू GST लागू करणे शक्य झाले नाही.
- कॉंग्रेस सरकारने GST लागू करण्यासाठी 115 वे घटनादुरुस्ती विधेयक, 2011 संसदेत मांडले. परंतु 15 वी लाकेसभा विसर्जित झाल्याने हे विधेयक संमत झाले नाही.
- मोदी सरकारने 19 डिसेंबर, 2014 रोजी GST संदर्भात 122 वे घटनादुरुस्ती विधेयक, 2014 लोकसभेत सादर केले.
- 6 मे, 2015 रोजी लोकसभेत GST विधेयक, 2014 ला मंजुरी देण्यात आली.

वस्तु व सेवा कर (GST)

CGST

१. उत्पादन शुल्क
२. सेवा कर
३. पुरवठयावरील उपकर व अधिभार
४. कापडी उत्पादनावरील अतिरिक्त कर
५. सीमाशुल्कावरील अतिरिक्त कर
६. केंद्रीय विक्रीकर
७. अतिरिक्त उत्पादन शुल्क
८. खरेदी कर
९. प्रवेश कर

SGST

१. राज्य विक्रीकर
२. अतिरिक्त विक्रीकर
३. जकात कर
४. करमणूक कर
५. जाहिरातीवरील कर
६. लॉटरी, जुगार व सट्टेबाजार कर
७. राज्यस्तरीय उपकर व अधिभार
८. चैनीच्या वस्तूंवरील कर

IGST

१. राज्याराज्यांतर्गत होणाऱ्या वस्तुंच्या आयात निर्यातीवरील कर.
२. या गटामध्ये समाविष्ट होणाऱ्या वस्तुंचा समावेश GST मध्ये होत नाही.

LGST

१. हा स्थानिक संस्था कर आहे.
२. या कराचा समावेश GST मध्ये होत नाही.

GST समित्या

1) विजय केळकर - 2004
2) असीम दासगुप्ता - 2009
3) सुशील कुमार मोदी - 2011
4) अब्दुल रहीम राथेर - 2013
5) के.एम. मणि - 2015
6) अमित मिश्रा राज्य वित्त मंत्री उच्चाधिकारी समिती - 2016

GST परिषद

- **स्थापना** - 12 सप्टेंबर, 2016
- **अध्यक्ष** - केंद्रीय वित्तमंत्री
- **उपाध्यक्ष** - सर्व राज्यांतर्फे नामनिर्देशित मंत्री
- **सचिव** - केंद्रीय महसुल सचिव
- **सदस्य** - CBDT व CBIC अध्यक्ष, उत्पादन शुल्क व सीमाशुल्क विभाग अध्यक्ष, सर्व घटकराज्यांचे वित्तमंत्री, केंद्रीय वित्तीय राज्यमंत्री.
- **मुख्यालय** - नवी दिल्ली

GST चे दर

0% जीवनाश्यक वस्तू, सोने, चांदी, मानवी वापरासाठीचे मद्य, विद्युत कर, मुद्रांक शुल्क, मुलभूत सिमा शुल्क, पेट्रोलियम उत्पादने, नैसर्गिक वायू आणि विमानाचे इंधन.

5% नेहमी वापराच्या व सर्वाधिक खपाच्या जीवनावश्यक वस्तू.

18% GST प्रमाणित दर बहुतांशी वस्तूंचा यामध्ये समावेश आहे.

28% सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ, आलिशान गाड्या, शीतपेय व इतर चैनीच्या वस्तू. याशिवाय या वस्तूंवर उपकर व अधिभार लागून कराचे एकुण प्रमाण 40% आसपास पोचेल.

GST चे गुण व दोष

गुण

- भारतीय उद्योगात स्पर्धा वाढेल.
- अप्रत्यक्ष कर सुलभ होतील.
- कर दरात घट होईल.
- काही वस्तूच्या किंमती कमी होतील.
- कर वसुलीचा खर्च कमी होईल.

दोष

- राज्याच्या महसुलावर परिणाम
- सेवांच्या किमतीत वाढ होते.
- GST ची दर निश्चिती

क्र.	कराचा प्रकार	अकारणी	वसुली	उत्पन्न (लाभ)
1.	महामंडळकर	केंद्र	केंद्र	केंद्र
2.	सीमा कर	केंद्र	केंद्र	केंद्र
3.	आयकर	केंद्र	केंद्र	केंद्र
4.	जमीन महसुल	राज्य	राज्य	राज्य
5.	जकात कर	राज्य	राज्य	राज्य
6.	जाहिरात कर (वर्तमानपत्र वगळून)	राज्य	राज्य	राज्य
7.	विक्रीकर (वर्तमानपत्र वगळून)	राज्य	राज्य	राज्य
8.	मुद्रांत शुल्क	केंद्र	राज्य	राज्य
9.	राज्य अबकारी कर	केंद्र	राज्य	राज्य
10.	रोखे बाजारातील व्यवहारावरील कर	केंद्र	केंद्र	राज्य
11.	वर्तमानपत्राच्या विक्री व जाहिरातीवरील कर	केंद्र	केंद्र	केंद्र
12.	प्रवासावरील कर (रस्ते वगळता)	केंद्र	केंद्र	राज्य
13.	महसुल	केंद्र	केंद्र	राज्य व केंद्र

क्र.	कराचे प्रकार		समित्या
1.	प्रत्यक्ष कर	1971	वांच्छू समिती
2.	प्रत्यक्ष कर	1971	चोक्सी समिती
3.	अप्रत्यक्ष कर (VAT)	1976	एल.के.झा समिती
4.	अप्रत्यक्ष कर	1976	रेखी समिती
5.	कृषी कर	1972	राज समिती
6.	केंद्र-राज्य कर वाटप	1972	राजमन्नार समिती
7.	कर सुधारणा	1991	राजा चलैय्या समिती
8.	प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर	2002	विजय केळकर कार्यगट
9.	सेवा व वस्तुकर	2011	राज्य वित्त मंत्रालय प्राधिकरण समिती अध्यक्ष - सुशिलकुमार मोदी